[illegible]

[illegible]

# प्रकरण - तिसरे

## कथाकथन पध्दती

3.1 प्रस्तावना.

3.2 विविध विषय अध्यापनाच्या पध्दतींची उपयुक्तता.

3.3 इतिहासाच्या विविध अध्यापन पध्दती.

3.4 कथाकथन पध्दतीची उपयुक्तता.

3.5 कथाकथन पध्दतीची तंत्रे.

3.6 कथाकथन पध्दतीचा प्रारंभ.

3.7 कथाकथन पध्दतीचा शेवट.

3.8 समारोप.

# प्रकरण - तिसरे

## कथाकथन पध्दती

### 3.1 प्रस्तावना:

मागील प्रकरणात ( प्रकरण 2 ) संशोधनासाठी निवडलेल्या विषयाच्या संबंधित परिचित साहित्य व संशोधनाचा उहापोह केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणाच्या नावावरुन या प्रकरणाचा उद्देश व प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी सैध्दान्तिक पार्श्वभूमी विशद करणे हा आहे हे स्पष्ट होते. "कनिष्ट माध्यमिक स्तरावरील इतिहास अध्यापनातील कथाकथन पध्दती अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने केलेला अभ्यास." हा संशोधनाचा विषय असल्यामुळे सहाजिकच विविध विषयांच्या अध्यापनात पध्दतींची उपयुक्तता कोणती आहे, इतिहास अध्यापन पध्दती कोणत्या, त्यांचा थोडक्यात उहापोह व कथाकथन पध्दतीच्या तंत्रांची सखोल माहिती, त्यांचा वापर इत्यादी बाबींचा उहापोह करणे आवश्यक आहे. तोच प्रस्तुत प्रकरणाचा उद्देश आहे.

### 3.2 विविध विषय अध्यापनाच्या पध्दतींची उपयुक्तता:

कोणत्याही विषयाचे अध्यापन चांगल्या पध्दतीशिवाय परिणामकारक होऊ शकत नाही. विषयाचे अध्यापन क्षमतापूर्वक व सफल व्हावे म्हणून शिक्षक, शिक्षकतज्ञ व विचारवंत अध्यापन पध्दतीबद्दल गंभीरपणे विचार करीत असलेले आढळून येतात. शिक्षणाची ध्येये, मूल्ये, उद्दिष्टे यांच्या खालोखाल अध्यापन पध्दती हा एक महत्वाचा प्रश्न आहे म्हणूनच अनेक पध्दती उदयास आलेल्या दिसतात.

> The Secondary Education Commission has emphasised the need for right methods of teaching in these words, "Every teacher and educationist of experience knows that even the best curriculum and the most perfect

syllabus remains dead unless quickened into life by the right methods of teaching and the right kind of teachers. Sometimes even an unsatisfactory and unimaginative syllabus can be made interesting and significant by the gifted teacher who does not focus his mind on the subject matter to be taught or the information to be imparted, but on his students, their interests and aptitudes, their reaction and response. He judges the success of his lesson not by the amount of matter covered but by the understanding, the appreciation and the efficiency achieved by the students."[1]

अध्यापन पध्दतीबद्दल एका पक्षाचे आग्रहपूर्वक मत असे की शिक्षकांजवळ विषयज्ञान भरपूर व भक्कम असले की बस्स। विद्यार्थ्यांना ते कसे आणि किती द्यावयाचे याचा तो मार्ग शोधतो, योजना आखतो आणि स्वयंनिर्णित पध्दतीनुसार अध्यापन करतो. मग औपचारिक पध्दती व तंत्राची गरजच काय? तर दुसऱ्या पक्षाचे मत असे की, शिक्षकास विशिष्ट ज्ञान असणे अपेक्षित आहे, पण सर्व शिक्षकांपाशी ते ज्ञान समान प्रमाणात असू शकत नाही आणि त्यांच्यापाशी जे ज्ञान आहे ते विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे देऊ शकतात असे निश्चितपणे म्हणता येत नाही. शिक्षणाची ध्येये, मूल्ये व उद्दिष्टे याबद्दलचे ज्ञान शिक्षकास असणे अगत्याचे आहे. त्यांचे वयोमान, मनोरचना, अभिरुची, कुवत व गरजा याबद्दलच्या त्यांच्या कल्पना स्पष्ट असल्या पाहिजेत. अध्यापन ही एक कला आहे असे म्हटले तर तिचे स्वतंत्र असे तंत्र असते.

कारागिरांचे महत्व त्यांच्या अंगी असलेल्या गुणांवर व कौशल्यावर अवलंबून असते.

इतिहासाचे अध्यापन खरोखर कठीण आहे. अपरिचित आणि अनाकलनीय अशा भूतकालीन गोष्टीत मुलांचे मन एकाएकी रमत नाही. त्या भूतकालीन गोष्टींची यथार्थ कल्पना आल्याशिवाय मुलांचे लक्ष वेधणार नाही. त्यांना भूतकाळाची स्पष्ट कल्पना यावी म्हणून मानसशास्त्रीय अध्यापन पध्दती व शैक्षणिक साहित्य यांचा उपयोग करावयास पाहिजे त्याचप्रमाणे इतिहास शिक्षकाने हे लक्षात ठेवावयास पाहिजे की, केवळ अध्यापन पध्दती किंवा शैक्षणिक साधने इतिहासाचे अध्यापन मनोरंजक व समाधानकारक करु शकणार नाहीत तर पध्दती व साधने वापरणारा जो शिक्षक तो महत्वाचा घटक आहे. शिक्षकालाच जर इतिहासाची गोडी नसेल तसेच शिक्षकच इतिहासात रमत नसेल तर तो इतिहासाची गोडी कशी लावू शकेल? इतिहासाचा मर्मग्राही अभ्यास सापेक्षाने करावयास पाहिजे. जो विषय शिकवावयाचा असेल त्या विषयाचे सांगोपांग ज्ञान असल्याशिवाय अध्यापन पध्दती परिणामकारक होणार नाही. त्याने इतिहासाचे भरपूर वाचन केले पाहिजे व करत राहिले पाहिजे तरच त्याला इतिहासाच्या वेगवेगळ्या पध्दतीप्रमाणे अध्यापन करता येईल.

## 3.3 इतिहासाच्या विविध अध्यापन पध्दती:

इतिहासाच्या विविध अध्यापन पध्दती पुढीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1) | कथन पध्दती | Narration Method. |
| 2) | चर्चा पध्दती | Discussion Method. |
| 3) | आधार पध्दती | Source Method. |
| 4) | स्वाध्याय पध्दती | Dalton Plan. |
| 5) | प्रकल्प पध्दती | Project Method. |
| 6) | क्रमिक पुस्तक पध्दती | TextBook Method. |
| 7) | समस्या पध्दती | Problem Method. |
| 8) | समकेंद्र पध्दती | Concentric Method. |
| 9) | विषयानुसारी पध्दती | Topical Method. |
| 10) | कथाकथन पध्दती | Story telling Method. |

1) **कथन पध्दती** Narration Method.

या पध्दतीत भूतकालीन घटनासंबंधीची माहिती शिक्षकालाच सांगावी लागते. यामध्ये मुलांना जे माहित असते ते प्रश्नाच्या सहाय्याने काढून घेऊन जी नवीन माहिती सांगावयाची असते ती कथन केली जाते. कारण जर मुलांना माहित नसलेल्या गोष्टीविषयी प्रश्न विचारले तर मुले तर्क वितर्क करतात हे योग्य नाही. म्हणून शिक्षकांनी मुलांचे कडून कोणत्या गोष्टी काढून घ्यावयाच्या, कोणत्या गोष्टी सांगावयाच्या याचा विचार करणे आवश्यक आहे. कथन करतांना चित्रे, नकाशे, प्रतिकृती यांचा वापर मात्र कटाक्षाने होणे आवश्यक आहे. कथनाची भाषा सोपी व सुबोध असावी लागते. कथनाचे ओघात फलक लेखन मुद्देसुद व्हावे लागते व ते लेखन विद्यार्थ्यांच्या वहीमध्ये लिहून घेण्यास त्यांना संधी द्यावी लागते.

2) **चर्चा पध्दती:** Discussion Method.

या पध्दतीमध्ये कथनाच्या ओघात शिक्षकांकडून मुलांच्या विचारशक्तीला चालना देणारे प्रश्न विचारले जातात. केवळ श्रवणभक्ती करुन चालत नाही तर इतिहासात ज्या घटना घडतात आणि ज्यांचा प्रभाव राजकीय, सामाजिक, धार्मिक जीवनावर पडतो अशा ठळक घटनांमध्ये कार्यकारणभाव शोधण्याचा प्रयत्न शिक्षकांनी केला पाहिजे आणि तशी विचार करण्याची सवय मुलांना जडविली पाहिजे. इतिहासाच्या अध्यापनाने मुलांची ऐतिहासिक विचारसरणी वृध्दिंगत झाली पाहिजे त्यासाठी चर्चात्मक पाठाचा उपयोग होणार आहे.

3) **आधार पध्दती:** Source Method.

मूळ कागदपत्र, थोर इतिहासकारांचे ग्रंथ इत्यादींचा मराठी 3 री, 4 थी व इंग्रजी 5 वी ते 7 इयत्तापर्यंत ऐतिहासिक वातावरण निर्माण होण्यास या पध्दतीचा चांगला उपयोग होतो. वरच्या वर्गात कागदपत्रावर प्रश्न देऊन त्या द्वारे विद्यार्थ्यांच्या चिकित्सक बुध्दीला उत्तेजन देता येते. हा क्रियात्मक भाग हे या पध्दतीचे वैशिष्टय होय. परंतु तरीही या पध्दतीचा सर्रास उपयोग करता येईल असे नाही.

4) **स्वाध्याय पध्दती:** Dalton Plan

डाल्टन किंवा स्वाध्याय पध्दती ही अमेरिकेत उदयास आलेली एक अध्ययनाची स्वावलंबी पध्दती आहे. मॅसॅच्युसेट्स राज्यात डाल्टन या गावी मिस् हेलन पार्कहर्स्ट या शिक्षिकेच्या कल्पनेतून या पध्दतीचा उगम झाला. वर्गपध्दतीत एकाच पध्दतीने शिकविले तर कांही मुलांची कुचंबणा होते तर काहींची ओढाताण होते. बुध्दीमान मुलांना इतरांसाठी थांबावे लागते म्हणून प्रत्येकाच्या बुध्दीला सोयीस्कर पध्दती तिने शोधून काढली. तिला स्वाध्याय किंवा डाल्टन पध्दती म्हणतात. या पध्दतीत मुले स्वावलंबनाने व स्वप्रयत्नाने ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करतात. शिक्षकाचे मार्गदर्शन त्यांना लाभतेच परंतु मुख्य भर मुलांनी केलेल्या स्वतःच्या प्रयत्नावर आहे. आणि ही गोष्ट शैक्षणिक दृष्ट्या अतिशय महत्वाची आहे. सर्व विषयांसाठी ही उपयुक्त ठरते. या पध्दतीत शिक्षक प्रत्येक विषयखंडावर स्वाध्याय ठरवून देतात आणि ते स्वाध्याय किती मुदतीत पुरे करावयाचे त्याचे वेळापत्रक तयार करतात. म्हणजेच ठराविक अवधीत विद्यार्थ्यांने आपल्या सवडीप्रमाणे ग्रंथालयात जावयाचे, शिक्षकाने निर्देशित केलेली पुस्तके वाचावयाची व दिलेल्या स्वाध्यायासंबंधी टिपणे तयार करावयाची आणि ते लिखाण शिक्षकांना सादर करावयाचे. प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःच्या बुध्दीप्रमाणे, आवडीप्रमाणे व जरुरीप्रमाणे अभ्यास करण्याची मुभा असते. ह्या पध्दतीने मुलांच्या ठिकाणी स्वप्रयत्नाने ज्ञानार्जन होऊन त्यांच्यामध्ये संशोधनवृत्तीचे बीज मूळ धरते. शैक्षणिक व तात्विकदृष्ट्या ही स्वाध्याय पध्दती लक्षणीय आहे.

5) **प्रकल्प पध्दती ( व्यवसाय पध्दती ):** Project Method

व्यवसाय वा योजना पध्दतीची संकल्पना सर्वप्रथम किलपॅट्रीक यांनी मांडली व नंतर ती प्रसिध्द अमेरिकन शिक्षणतज्ज्ञ प्रोफेसर जॉन ड्यूईने शिक्षणक्षेत्रात सुरु केली. त्याने विचारापेक्षा कृतीला महत्व दिले. कृती करीत असतांना जो अनुभव येतो तो व्यक्तीला उपयोगी पडतो आणि कृती करीत करीत अनुभव मिळविणे म्हणजेच 'खरे शिक्षण' असे जॉन ड्यूईने म्हटले आहे. मुलांना त्यांच्या उपजत बुध्दीप्रमाणे व त्यांच्या अंतःस्फूर्तीप्रमाणे कृती करण्यास पूर्ण स्वातंत्र्य द्यावे व ती कृती यशस्वी होण्यास त्यांना अनुकूल वातावरण पुरवावे म्हणजे मुलांना

उपयुक्त असा अनुभव मिळू शकेल. अर्थात हा अनुभव शिक्षकांच्या मार्गदर्शनाखालीच मिळावयास पाहिजे. कृतीतून अनुभव मिळविण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षण असे जॉन ड्यूईचे मत होते. या मतातूनच व्यवसाय पध्दती निर्माण झाली. ह्या पध्दतीत एखादा व्यवसाय किंवा योजना किंवा प्रकल्प निवडावयाचा, त्याचे उद्दिष्ट ठरवावयाचे, ते उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कोणती सामग्री, कोणती साधने वापरावयाची, त्यांची नोंद करावयाची, सर्व सामग्री जुळविल्यावर त्याची योग्य ती मांडणी करुन त्या व्यवसायाची किंवा योजनेची सर्वंकष किंवा समग्र कल्पना आखावयाची अशी योजना असते.

6) **क्रमिक पुस्तक पध्दती:** Text Book Method.

क्रमिक पुस्तकाचा उपयोग विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकांना होत असतो. त्यातल्या त्यात विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग जास्त प्रमाणात होत असतो. शिक्षकांना केवळ अध्यापनाच्या मर्यादा कळण्यासाठी, ऐतिहासिक घडामोडी कोणत्या पध्दतीने शिकवावयाच्या यासाठीच होतो. पूर्वी मात्र या क्रमिक पुस्तकाचा अनेक पध्दतीने वापर करण्यात येत असे. पठण पध्दती, पंतोजी पध्दती, पूर्वतयारी पध्दती, हेतूप्रश्न देऊन मौन वाचन पध्दती, सारांश पध्दती, आवृत्ती पध्दती, समस्या पध्दती इत्यादी वेगवेगळ्या पध्दतीने क्रमिक पुस्तकाचा वापर केला जात असे म्हणून यांना क्रमिक पुस्तक पध्दती असे म्हटले जात असे. या सर्व पध्दती त्याज्य मानल्या जातात. इतिहास या विषयाच्या अध्यापनासाठी त्या उपयुक्त ठरत नाहीत. त्यातल्या त्यात आवृत्ती पध्दतीचा वापर विद्यार्थ्यांना होऊ शकतो.

7) **समस्या पध्दती:** Problem Method.

शिक्षण क्षेत्रात विद्यार्थी हा एक महत्वाचा घटक आहे आणि ज्ञान संपादन करण्याची त्याला तृष्णा हवी, शिकण्याची उर्मी हवी. या विचारमंथनातूनच समस्या पध्दती उदयास आली. सुप्रसिध्द शिक्षणवेत्ते जॉन ड्यूई हे या पध्दतीचे मूळ जनक होत. समस्या व्यक्तीस क्रिया व विचार करण्यास प्रवृत्त करते आणि या प्रक्रियेद्वारा तिला ज्ञान प्राप्त होते. म्हणून व्यक्तीच्या कार्यशक्तीला आव्हान देऊ शकणारी आणि विचार शक्तीला प्रेरणा देणारी समस्या पध्दती अत्यंत उपयुक्त आहे असा या पध्दतीच्या पुरस्कर्त्यांचा दावा आहे.

अभ्यासक्रमांतर्गत समस्येची उकल करीत असतांना विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, तर्कशक्ती, चिकित्सक वृत्ती, विचारशक्ती आणि निर्णयशक्ती या गुणांचा विकास व्हावा हे समस्या पध्दतीचे प्रधान उद्दिष्ट आहे. समस्येचा अभ्यास करतांना विद्यार्थ्यांना नवीन माहिती मिळते व नवीन अनुभव प्राप्त होतात. हे अनुभव म्हणजेच त्या विषयाचे ज्ञान असते. इतिहास या विषयात सखोल विचार करण्यास भरपूर वाव आहे म्हणून हा विषय शिकविण्यास ही पध्दती विशेष योग्य आहे असे मानले जाते.

8) **समकेंद्र पध्दती:** Concentric Method.

अभ्यासक्रमाची वर्गवार रचना करताना प्रत्येक इयत्तेत त्याच देशाचा व कालाचा इतिहास शिकविला जातो. प्रत्येक इयत्तेत मात्र त्या इतिहासातील एखाद्या विशेष भागावर अधिक लक्ष पुरवले जाते. याप्रमाणे तोच तो अभ्यासक्रम अधिकाधिक तपशीलासह शाळेतील सर्व वर्गात या पध्दतीने शिकविला जाईल असे अभिप्रेत आहे. परंतु या पध्दतीने सहसा अध्यापन केले जात नाही. कारण फायद्यापेक्षा यात बरेच दोष आढळत असल्याने त्यावर आक्षेप घेतले जातात.

9) **विषयानुसारी पध्दती:** Topical Method.

या पध्दतीमध्ये इतिहास कालक्रमानेच शिकवावयाचा परंतु एकेक महत्वाचा प्रश्न किंवा मुद्दा घेऊन आरंभापासून शेवटपर्यंत तो न्यावयाचा. तो संपल्यावर परत मागे वळायचे. दुसऱ्या मुद्याला सुरुवात करायची तो शेवटपर्यंत न्यावयाचा परत मागे यायचे आणि तिसऱ्या मुद्यासह वाटचाल करायची. एवढाच या पध्दतीचा अर्थ आहे. ही पध्दती प्रौढ विद्यार्थ्यांना उपयोगी पडते कारण ही विचार गर्भ पध्दती आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना ती उपयुक्त ठरत नाही.

10) **कथाकथन पध्दती:** Story - Telling Method.

लहान मुले कथाबेल्हाळ असतात. मुलांच्या याच वृत्तीचा अध्यापनात शिक्षकाला उपयोग करुन घेण्याच्या दृष्टीने ही पध्दती अवलंबात आणली जाते. गोष्ट सांगणे ही एक कला आहे.

गोष्ट सांगणे हे काम कांही सोपे नाही. ही कला आत्मसात करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. अनेक तंत्रांचा अभ्यास, सराव करावा लागतो. लहान वयात इतिहासाची गोडी लावण्याच्या दृष्टीने, ऐतिहासिक दृष्टीकोन निर्माण होण्यासाठी व पुढे इतिहास हा विषय कंटाळवाणा वाटू नये, रटाळ वाटू नये यासाठी व या लहान वयातच इतिहासाची आवड निर्माण होण्यासाठी कथाकथन पध्दतीचा वापर जाणीवपूर्वक व्हावा असे अभिप्रेत आहे.

> An American Educator of children says, "Story telling is not only a gift, but also an acquisition." Any teacher therefore can learn the art of Story - telling. [2]

### 3.4 कथाकथन पध्दतीची उपयुक्तता:

कथ म्हणजे सांगणे, निवेदन करणे. या कथपासूनच कथा हा शब्द आला. अनुभवाला मग कल्पकतेची जोड मिळाली. माणसाने आपल्या सभोवताली दिसणाऱ्या सृष्टीची गूढे उकलण्याचा प्रयत्न केला आणि यातूनच कथेचा जन्म झाला.

कथाकथन पध्दती ही फार पूर्वीपासूनची भारतातील प्राचीन अशी पध्दती आहे. त्या काळीदेखील अशिक्षित आई, आजी आपल्या सजग नसलेल्या मुलाला गोष्ट सांगत असे. या बालकाला गोष्ट ही संकल्पनाही माहित नसते. मात्र गोष्ट म्हटल्याबरोबर ते सावरुन ऐकण्याच्या तयारीने बसते आणि एकाग्र चित्ताने गोष्ट ऐकते. म्हणजेच गोष्ट या शब्दात असे सामर्थ्य आहे की तो शब्द ऐकल्याबरोबरच कमालीचा आनंद त्याला होतो आणि या गोष्टीच्या कोणत्याही तंत्राचा अभ्यास नसलेल्या आई, आजी कडून कथारुपात सांगितलेल्या बाबी प्रभावीरित्या, परिणामकारकरित्या बालकाच्या मनावर ठसल्या जातात. कथा ही एक अशी बाब आहे की ऐकणाऱ्या व्यक्तीच्या भावनांना आवाहन करण्याचे सामर्थ्य त्यात असते. त्यामुळे बालक प्रभावित होते. तसेच कथाकथनात उत्कटता, जवळीकता निर्माण करण्याचे सामर्थ्य असते.

केवळ बालकाला कथा आवडते असे नाही तर बाल्यावस्थेपासून वृध्दावस्थेपर्यंत माणसाची सतत जर करमणूक कोणी केली असेल तर ती गोष्टीने. गोष्ट ही माणसाची सांस्कृतिक भूक आहे.

"गोष्टीमध्ये काय जादू भरलेली आहे न कळे, गोष्ट न आटणारा आनंदाचा झरा आहे खास. गोष्ट खरी असो की काल्पनिक असो ती माणसाचे मन रिझवते. निश्चित मानवी इतिहास ही एक गुंतागुंतीची लांबलचक गोष्ट आहे. गुंतागुंतीतून ती अधिक आकर्षक वाटते. तिच्यातील गुंतागुंत मोकळी झाली म्हणजे ती आनंददायी होते." [3]

गोष्ट सांगणे आणि गोष्ट ऐकणे ह्या अनुभवाच्याच गोष्टी आहेत. कथा निवेदकाने गोष्ट सांगणे आणि ती मुलांनी ऐकणे हा अनुभव कसा असतो ह्याचे सुरेख वर्णन इंग्लंडमध्ये राहणाऱ्या व मुलांना गोष्टी सांगण्यासाठी जगातील अनेक देशात प्रवास केलेल्या कथानिवेदिका एलियन कॉलवेल ह्यांनी केले आहे. त्या म्हणतात,

> "When Story - Teller and child meet, life is enriched for both by the sharing of a story. To have laughed together, shared excitement or sadness, experienced wonder and emotion, establishes a mutual feeling of warmth and comradeship, an experience worth all that it may cost in time and energy." [4]

तसेच कथा ही माणसाची सांस्कृतिक भूक आहे. मनुष्य हा एकटा राहू शकत नाही. जरी एकट्या मनुष्याला सुखवैभवाच्या राशीवर बसविले तरी एकटेपणाचे दुःख त्याला सलत राहते. माणसाला दुःखात, सुखात कथा ही सोबत करते. अनिवार सोबत करते कारण कथेलाही तिचे असे एक व्यक्तिमत्व असते. तिचा असा एक स्वभाव असतो.

तिची एक सृष्टी असते. या सृष्टीत माणसाला कधी आपली सृष्टी भेटते तर कधी जी सृष्टी दिसावी अशी त्याची इच्छा, आकांक्षा असते ती त्याला कथेत दिसते.

थोडक्यात जगाच्या पाठीवर कोठेही गेले तरी माणूस आणि गोष्ट ह्यांच्यात अतूट नाते आहे असे जाणवते. एडन चेंबर्स हा इंग्लीश कवी म्हणतो,

> "Though there are many people who say they do not enjoy or have time for literary reading; I have yet to meet anyone who does not like hearing a Story." 5

### १) विषय सुलभता:

एखादा विषय समजावून देण्यासाठी गोष्टीचे माध्यम हे फार उपयुक्त ठरते. गोष्टीमुळे विषय सुलभ करता येतो. ऐकणाऱ्यालाही तो झटकन आकलन होतो आणि मनावर ठसतो.

ज्ञान मिळविण्याच्या अनेक साधनांपैकी सहजगत्या ज्ञान करुन देणारे उत्कृष्ट साधन म्हणजे कथा होय. एखाद्या विषयाचे तासन्तास निरुपण करुन जे तत्व समजणे कठीण पडते ते कल्पित कथेच्या योगाने मनावर ठसते. या कथेच्या वेष्ठनाआडूनच मुलांना ज्ञान भरविण्याची क्रिया आपल्या समाजात आजच्या काळातच नव्हे तर फार पूर्वीपासून चालत आली आहे. उदा. पंचतंत्र, हितोपदेश या कथासंग्रहांच्या आधारे मुलांना अधिक ज्ञान प्राप्त करुन दिले जाते.

तसेच कथाकथनाच्या अध्यापनाला मानसशास्त्रीय बैठक आहे. मानसशास्त्राने सोळा, सतरा वर्षापर्यंतच्या या पहिल्या श्रेणीतील मुलांना मानसशास्त्रदृष्ट्या बाल असे म्हटले आहे.

"पहिल्या श्रेणीतील ही मुले वयाने लहान असतात. त्यांचे अनुभव मर्यादित असतात. त्यांना फार वेळ इंद्रियगम्य वस्तूंच्या मदतीवाचून निर्भेळ विचार करणे किंवा ती समजून घेणे जमत नाही. अशा वयातील मुले गोष्टी सांगताना त्यात रंगतात. याचा आधार घेऊन शिक्षणात कथेला महत्व प्राप्त झाले आहे. 6

2) कथाकथन सहजप्रवृत्तीतून संस्कार:

कथा ऐकणे ही मुलांची अगदी सहजप्रवृत्ती आहे. त्यांना खाऊ आणि खेळणी ह्यांच्या इतकीच गोष्टही प्रिय आहे. मुलांचा भाषेशी प्रथम परिचय होतो तो गोष्टीच्या माध्यमातूनच. नीती अनितीच्या कल्पना मुलांच्या मनात बोधपर कथा ऐकूनच निर्माण होतात आणि हे सर्व अप्रत्यक्षपणे अगदी सहजपणे घडते. एकीकडे गोष्ट ऐकता ऐकता मुलांची छानपैकी करमणूक तर होतेच पण नकळत मनावर संस्कारही होत रहातात.

मूल हे जन्मतः चांगले की वाईट असते, सुसंस्कारित असते की नसते हे शास्त्रीय प्रयोगाच्या आधारे सिध्द झालेले नाही. आज माहिती असलेल्या ज्ञानाच्या आधारे मूल जन्माला येते त्यावेळी एक विकासक्षमता घेऊन जन्माला येते व आयुष्यात ते पुढे चांगले होणार की वाईट हे त्याच्या मनावर वेळोवेळी आणि अनेक मार्गांनी होणाऱ्या संस्कारावर अवलंबून असते. संस्कार ह्या शब्दाचे भारतीय संस्कृतीकोशात चांगले करणे, वस्तूतील वैगुण्य दूर करुन तिला नवे आकर्षक रुप देणे, उजाळा देणे, स्वच्छ करणे असे अनेक अर्थ दिले आहेत पण सर्वसामान्य माणसाला समजेल असा ह्या शब्दाचा अर्थ म्हणजे विशिष्ट प्रकारचे वळण, छाप किंवा ठसा.

म्हणून विद्यार्थ्यांचे मनोरंजन करीत त्यांच्यावर संस्कार करण्याचे काम कथा करीत असते. ह्या दोन बाबी परस्परपूरक आहेत कारण मनोरंजन याचा अर्थ मनाला आनंद देणारा, सुखकारक, पुन्हा पुन्हा प्रत्यय घ्यावासा वाटणारा, विचार करावयास लावणारा, सद्भावनांना आवाहन करणारा, निराळ्या अनुभव विश्वात घेऊन जाणारा, अशा प्रकारचा अनुभव इतका मोठा व व्यापक आहे. हा अर्थ लक्षात घेतला तर मनोरंजन आणि संस्कार ह्यात अंतर्विरोध असण्याचे कारण नाही हे मान्य करावे लागेल.

3) कथाकथन : एक समर्थ माध्यम:

पाश्चात्य देशात अगदी अलीकडच्या काळात परीकथांचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास सुरु झाला आहे. कांही मानसोपचार तज्ज्ञांना कथाकथनाचा मानसोपचारासाठीहि उपयोग होईल असेही वाटते व त्या दृष्टीने त्यांचे प्रयोग आणि संशोधन चालू आहे.

असे काम मोठ्या प्रमाणावर झाल्यानंतर कांही निश्चित माहिती हाताशी लागू शकेल. पण कथाकथन ह्या माध्यमात कांही सामर्थ्य आहे ह्याचा प्रत्यय मुलांना गोष्टी सांगणाऱ्या अनेकांना आला असेल. कथाकथनाचा उपयोग निव्वळ घटकाभर करमणुकीसाठी करणे म्हणजे या कलेतील सामर्थ्य पुरेपुर उपयोगात न आणल्यासारखे होईल. आज जगातील सर्वच देशांसमोर ढासळती मूल्यव्यवस्था ही फार मोठी समस्या आहे. याबाबत स्वामी विवेकानंद या आपल्या भारतीय शिक्षण तज्ज्ञांनी एके ठिकाणी म्हटले आहे, "जर आपली आर्थिक हानी झाली तर कांहीच हानी झाल्या नसल्यासारखे आहे, (कारण ती हानी पुन्हा आपण भरुन काढू शकतो.) जर आरोग्याची हानी झाली तर कांही प्रमाणात हानी झाल्यासारखे आहे, मात्र चारित्र्याची हानी झाली तर सर्वस्वाचीच हानी झाल्यासारखे आहे, कधीहि भरुन न येणारी ती हानी असते."

परंतु सद्यस्थितीतील चित्र अगदी याउलट असल्याचे दिसते. आर्थिक बाब हेच आपले सर्वस्व होऊन बसल्यामुळे त्यापुढे सर्वच बाबी आपल्याला गौण वाटतात. आजचा माणूस म्हणेल,'जर आर्थिक हानी झाली तर सर्वस्वाची हानी झाली आहे आणि चारित्र्याची हानी झाली तर कांहीच न गमावल्यासारखे आहे. त्याबद्दल कोणत्याही प्रकारची खंत त्याला वाटणार नाही. अशी ही परिस्थिती अत्यंत शोचनीय अशी आहे. त्यांत काही बदल हवा असेल तर सुरुवात ही बालवयापासून व्हावयाला हवी कारण बालवयात मनावर झालेले संस्कार आयुष्यात दीर्घकालपर्यंत टिकून रहातात. म्हणून व्यक्तीच्या चारित्र्याची घडण बालवयापासून उत्कृष्टप्रकारे होण्यासाठी ऐतिहासिक बाबीतून जीवनमूल्ये कसोशीने जपणाऱ्या नीतिमान, ज्यांच्या सतत आठवणी कराव्यात अशा व्यक्तींच्या चरित्रात्मक कथातून, घटनातून विद्यार्थ्यांचे मनावर चांगले संस्कार होण्यासाठी कथाकथन हेच समर्थ माध्यम आहे. ऐतिहासिक अशा व्यक्ती व घटना मुलांच्या डोळ्यासमोर राहायला हव्यात. त्याबाबत सतत मुले विचार करतील, चांगुलपणावरील त्यांचा विश्वास उडणार नाही ह्यासाठी प्रयत्न व्हावयाला हवेत. कथाकथन हे माध्यम ह्याबाबत बरेच कांही करु शकेल.

कथाकथनाच्या माध्यमविषयी बाबा आमटे असे म्हणतात, "कथाकथनाचा परिणाम असा होतो की,

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

Listener becomes an instant person when something enters in him." [7]

जसे प्रभावी लोहचुंबकाने सभोवतालचे कण पुरेपूर आकर्षून घ्यावेत त्याचप्रमाणे कथाकथकाच्या कथाकथनाने बाळगोपाळांचे नव्हे तर वडिलधाऱ्यांचेही कान आकर्षिले जातात. उत्सुकता निर्माण होते.

अशाप्रकारे शिक्षणात कथेला अनन्य साधारण जे महत्व प्राप्त झाले त्यामुळेच अभ्यासक्रमात कथाकथनाला स्थान दिले आहे.

कथांचे अनेक प्रकार पुढीलप्रमाणे आहेत. सर्वच प्रकारांना कथांची तंत्रे लागू पडतात.

**कथाप्रकार**

1) ऐतिहासिक कथा.
2) प्राणी कथा.
3) सृष्टी कथा.
4) नीति कथा.
5) परी कथा.
6) लोक कथा.
7) तालकथा किंवा गीत कथा.
8) धर्मकथा किंवा पौराणिक कथा.
9) साहस कथा.
10) चातुर्य कथा.
11) चरित्र कथा.
12) विज्ञान कथा.
13) स्वातंत्र्य कथा.

**ऐतिहासिक कथा:**

इतिहास या शब्दाची व्युत्पत्ती इति + ह + आस म्हणजे असे होते अशी आहे. यावरुन भूतकाळातील कथा असाच अर्थ होतो. इतिहास कालातील म्हणजे गतकाळातील इतिहास किंवा ऐतिहासिक कथा. प्रत्येक देशाला त्याचा असा एक भूतकाळ असतो. तो देश अस्तित्वात कसा आला, कैंव्हा आला, कोणाच्या प्रयत्नाने आला, त्या देशावर शासन कोणी केले, कसे केले, राष्ट्र किंवा देशाच्या जीवनातील चढउतार, गौरव, लांछन, जय पराजय इ. गोष्टी इतिहासात नमूद असतात. परंतु लढाया किंवा राजवंशाच्या सनावल्या म्हणजेच केवळ इतिहास नव्हे. फार तर हा राजकीय इतिहास होईल. पण देशाला संस्कृती ही असते. त्या त्या काळात कांही सांस्कृतिक कामेही होत असतात. तेव्हा ह्या वाटचालीतही चढउतार इ. गोष्टी असतात. तेव्हा या वाटचालीची नोंद इतिहासाला घ्यावी लागते. याला सांस्कृतिक इतिहास म्हणतात. सध्या कांही शिक्षणतज्ज्ञांच्या मते राजकीय इतिहासापेक्षा सांस्कृतिक इतिहासच महत्वाचा आहे.

इतिहास हा व्यापक विषय आहे. इतिहासाची व्यापक दृष्टी घेऊन मुलांना इतिहासातील वेचक प्रसंग गोष्टीरुपाने सांगितले पाहिजेत. त्या प्रसंगकथेत पराक्रम, शौर्य, जिद्द, देशभक्ती, स्वातंत्र्यप्रेम, स्वामिनिष्ठा, वीरश्री असे खूपच सद्गुण असतात. बालकाच्या कोवळ्या मनावर ह्या गोष्टी देशप्रेमाचे संस्कार करतील, राष्ट्रीयत्वाचे स्फूरण देतील, देशाचा वैभवशाली, गौरवशाली इतिहास ऐकता ऐकताच या देशाचा मी नागरिक आहे, हा माझा देश आहे, तो सर्वार्थांनी धन्य केला पाहिजे ती माझी जबाबदारी आहे, मी माझ्या देशासाठी तनमनाने झटले पाहिजे, देशाच्या हितामध्येच माझेही हित सामावलेले आहे, प्रसंग पडल्यास प्राणाचीही किंमत मोजून देशाचे स्वातंत्र्य रक्षण केले पाहिजे, राष्ट्रगीताचा, राष्ट्रध्वजाचा मान राखला पाहिजे, त्या विषयी आदरभावना जोपासली पाहिजे, हेहि त्यांना पटविले पाहिजे. अशा तऱ्हेचे राष्ट्रीय चारित्र्य मुलांमध्ये निर्माण होण्यासाठीच इतिहासातील कथांचा उपयोग करुन घेतला पाहिजे नाहीतर विपरित परिणाम होण्याचीही शक्यता आहे. इतिहासात दोन धर्माचे, दोन जातीचे राजे

राजकाजावरुन लढणार, एकमेकांवर प्रतीहल्ले चढवणार, शह – काटशह, डाव – प्रतिडाव हे सगळे प्रकार यशःसिध्दीसाठी करणार तेव्हा तेथील एकाचाच पक्ष घेऊन दुस-याच्या जातीधर्माची निंदा, टवाळी करुन द्वेष, मत्सर उत्पन्न होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. दोन जमातींमध्ये पिढ्यान्‌पिढ्यांची वैरे निर्माण झाली आहेत. त्यांचे चटके आजही राष्ट्राला सोसावे लागत आहेत. तेव्हा पुराणांप्रमाणेच इतिहासातील असा आक्षिप्त भाग सोडून द्यावा. एखाद्या घटनेवर फाजील भर देऊन एखाद्या धर्माबद्दल द्वेषभावना न कळतही होऊ नये. ऐतिहासिक गोष्टीतून शौर्य, पराक्रम, देशभक्ती इत्यादी सद्‌गुण अंगी बाणावेत. आपल्या देशाचा गतकाळ कळावा. एवढ्याचा दृष्टीने त्यांचा उपयोग व्हावा आणि मुलांची मने इतिहासातच किंवा भूतकाळातच सदैव रमणार नाहीत याचीही दक्षता घ्यावी. त्यांच्या हाताशी वर्तमान आणि डोळ्यांपुढे भविष्यकाळ आहे तसेच इतिहास नुसता ऐकायचा, वाचायचा नसून तो घडवायचाही आहे याची जाण त्यांना करुन द्यावी.

त्याचप्रमाणे चरित्र संवर्धनासाठी आदर्शाची गरज असते. आपल्या देशात किंवा परदेशातही निरनिराळ्या क्षेत्रात अनेक थोर महापुरुष होऊन गेलेले आहेत. आज जरी ते काळाच्या पड्द्याआड झालेले असले तरी त्यांचे कार्य, विचार ग्रंथसंस्था इत्यादी रुपात नव्या पिढीला उपलब्ध होत असते. त्यांचे जीवन–चरित्र दीपस्तंभाप्रमाणे प्रकाश देत असते. त्यांच्या वाचनाने, श्रवणाने स्फूर्तिचा लाभ होऊ शकतो. शूर, वीर, संत, राजे, स्वातंत्र्यवीर, समाजसुधारक, विचारवंत, कलावंत, क्रीडापटू, शास्त्रज्ञ, शेती विशारद, उद्योगपती असे कितीतरी थोर पुरुष भिन्न भिन्न काळी भिन्न भिन्न क्षेत्रात होऊन गेलेले असतात. अशांच्या चरित्रकथा मुलांना प्रेरणादायी ठरतात. अमक्याचे चरित्र वाचले आणि त्याच्यावर त्याचा प्रभाव पडला असे आपण म्हणतो, ऐकतो, वाचतो तेंव्हा महापुरुषांच्या चरित्रात एवढे जे सामर्थ्य असते त्याचा बालविकासाच्या दृष्टीने उपयोग करुन घेतला पाहिजे. मुलांपुढे महापुरुषांचे समग्र चरित्र कथन करणे शक्य नसते. महापुरुषांच्या शिकवणीचा तात्विक भागही त्यांना आकलन होण्यासारखा नसतो. उदा. गांधीजींच्या सत्य, अहिंसा, सत्याग्रहाचे विवेचन मुलांसमोर

करता येणार नाही. केले तरी ते त्यांना झेपणार नाही. तसेच सोपे करुन सांगणे हे महाकठीण काम असते. म्हणून सत्य, अहिंसेचे तात्विक विवेचन करण्यापेक्षा गांधीजींना सत्याचे, अहिंसेचे दर्शन त्यांच्या आयुष्यात कसे घडले हेच त्यांच्या आत्मकथेतील प्रसंगाच्या आधारे गोष्टीरुपाने जर सांगितले तर अधिक परिणामकारक होईल आणि अशाच रितीने निरनिराळ्या महापुरुषांच्या चरित्रातील मुलांच्या आटोक्यात येतील असे प्रसंग, घटना निवडून त्या गुंफुन गोष्टीरुपाने मुलांच्या पुढे सांगता येतील त्याचप्रमाणे देशोदेशीचे स्वातंत्र्यलढे गोष्टीरुपाने सांगता येतील.

## 3.5 कथाकथन पध्दतीची तंत्रे:

ज्याप्रमाणे खेळाला कांही नियम ठरलेले असतात, संकेत ठरलेले असतात त्याचप्रमाणे कौशल्य, ताकद, वेग आणि Unlimited Spiritची सुध्दा आवश्यकता असते. ह्या सर्व गोष्टी एकत्रित जुळून आल्या तरच खेळ चांगला रंगतो. कथाकथनाला सुध्दा हे सारे नियम लागू होतात. कथेला गती हवी, चांगला रसदार आशय हवा, कथाकथन ही एक जिवंत कला असल्याने कथनाची कुशल हातोटी आणि मनावर पकड घेण्याचे सामर्थ्य हवे. कथाकथन करतांना कथाकथकाला ती कथा त्यावेळी विविध गोष्टींचे सहाय्य घेऊन जिवंत करावी लागते आणि अशाप्रकारे कथा जिवंत करण्यासाठी कथानिवेदकाला आधी ती अनुभवावी लागते. हे अनुभवणे तेव्हाच घडते जेव्हा त्या विषयाबद्दल अधिक आस्था असली पाहिजे. गोष्टीविषयी त्याच्या मनात जिव्हाळा व प्रेम असले पाहिजे. अशी निष्ठा व आस्था असेल तरच कथानिवेदकाला कथेच्या अंतरंगात प्रवेश करता येतो, तरच त्याला ती संपूर्ण गोष्ट उलघडते, तरच त्याला ती उमगते.

कथाकथन ही एक कला असल्याने कथानिवेदक हा एक कलावंत असतो. सर्वसाधारणपणे गोष्टी सांगणे निराळे आणि प्रभावीपणे उत्कृष्ट रितीने परिणामकारक गोष्ट सांगणे निराळे.

याबाबत रुथ स्वायर ही कथानिवेदिका म्हणते,

"It is the easiest thing in the world to tell a story and the hardest to be a fine story-teller."

"The art of story - telling lies within the story - teller. The secret of the gift lies in the six th sense of the true story - teller. Here is an indefinable something that acts as does the nose for the wine tester, as fingertips for the textite expert, as absolute pitch for the musicion. I think one may be born with this." 8

म्हणून उत्कृष्ट रितीने कथाकथन करण्यासाठी कांही तंत्रांचा अवलंब करावा लागतो. ती तंत्रे पुढीलप्रमाणे:

1) आत्मविश्वास.
2) तन्मयता.
3) वक्तृत्व.
4) शब्दसंपदा.
5) अभिनय.
6) शारीरिक अभिनय.
7) आवाजाची तयारी.
8) चित्रमयता.

9) बहुश्रुतपणा.

10) श्रोत्यांच्या ( विद्यार्थ्यांचा ) सहभाग.

11) वेळेचे भान.

1) **आत्मविश्वास:**

जसे एखादे कार्य किंवा कार्यक्रम व्यवस्थितरित्या पार पाडण्यासाठी त्याची तोंडी जुळवाजुळव करावी लागते, त्याचे सुनियोजन करावे लागते तसेच ते काम किंवा कोणतीही कला उत्कृष्टपणे प्रकट करावयाची म्हटली तर त्यासाठी त्या व्यक्तीच्या ठिकाणी भरपूर असा आत्मविश्वास असायला हवा. आत्मविश्वास हा एक व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा भाग असतो. कथानिवेदकाला त्याचे असे एक व्यक्तीमत्व हवे असते. कथानिवेदकाच्या बोलणे, हसणे, उठणे, बसणे या सर्वच क्रियांमधून त्याचे खरे व्यक्तीमत्व प्रकट होत असते आणि मुलांचे याकडे अतिशय बारीक लक्ष असते. यातूनच मुले शिकत असतात. बालवय असेच अनुकरणशील असते.

व्यक्तीचे बाह्य व्यक्तीमत्व भिन्न भिन्न क्रियांमधून व्यक्त होत असते. तसेच आंतरीक व्यक्तीमत्वही प्रकट होत असते. कथेचे निवेदन, निवेदनातील आत्मियता, तल्लीनता, इत्यादीमधून हे आंतरीक व्यक्तीमत्व प्रकट होत असते. याचाही परिणाम मुलांवर होत असतोच. मुले यातूनच नकळत शिकत असतात. त्याच्यातून त्यांची आवड, निवड, अभिरुची ह्यांची निर्मिती होत असते. त्यांना वळण लागत असते. म्हणून कथानिवेदकाने या गोष्टीकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे. ह्यातील प्रत्येक गोष्ट आत्मविश्वासपूर्वक करावी लागते.

कथानिवेदक जर आत्मविश्वासपूर्वक कथा सांगण्यासाठी मुलांपुढे आला तर त्याच्या व्यक्तीत्वातून प्रकट होणारा हा आत्मविश्वासच मुलांवर प्रथम क्षणी अनुकूल ठसा उमटवतो आणि कथानिवेदकाची कथा ही यशस्वी ठरते.

कथा सुरु करण्यापूर्वी आपली लीनता, नम्रता, सौजन्य व्यक्त करण्याची गरज नसते तर आत्मविश्वासपूर्वक कथेवर प्रभुत्व ठेवून कथेची आकर्षक सुरुवात करणे हीच कथेची प्रस्तावना होऊ शकते. बाकीचे काहीही अवांतर बोलण्याची गरज नसते.

प्रत्येक गोष्टीला तिची अशी एक घडण असते, चौकट असते. तिचेही विश्लेषण कांही निवेदक प्रस्तावनेत करीत असतात पण अशा त-हेने गोष्टीची औपचारिक प्रस्तावना केल्याने गोष्टीची रंगत कमी होते. ऐकणा-याचे औत्सुक्यही ओसरते म्हणून कथानिवेदकाने गोष्टीची जडण घडणही मोठ्या कौशल्याने व अनौपचारिक रितीने निवेदनाच्या ओघात सांगून टाकली पाहिजे.

एकंदरीत सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे कथानिवेदकाजवळ असावा लागतो तो आत्मविश्वास. आत्मविश्वास नसेल तर पुढच्या सर्व गोष्टी व्यर्थच ठरतील.

2) **तन्मयता:**

कोणतीही गोष्ट निटनेटकी, उत्तम, व्यवस्थित व्हावयाची असेल तर त्यासाठी तन्मयतेची आवश्यकता असते. खरं तर त्यावेळी त्या गोष्टीसाठी ते समर्पणच असते. देतांना मागेपुढे न पाहता हातचे राखून न ठेवता देण्याची ही उदार वृत्ती म्हणजेच विलक्षण उत्कटता. अशी उत्कटता असल्याशिवाय तन्मयता साधता येत नाही.

मुलांना गोष्ट सांगणा-या निवेदकाला केवळ गोष्टीविषयी आस्था असून चालणार नाही तर त्या आस्थेबरोबरच आस्थेला क्रियाशील करणा-या वृत्तीचीही जोड मिळावी लागते.

याबाबत रुथ स्वायर या कथानिवेदिकेचे म्हणणे असे की,

"Not a clever sharing of the mind alone, but rather a sharing of heart and spirit. story telling must do this if it is to endure." [9]

श्रोत्यांचे अवधान पूर्णपणे आपल्याकडे खेचून घ्यावयाचे असेल तर वक्त्याला व प्रेक्षकांचे लक्ष खिळवून ठेवावयाचे असेल तर नटाला ज्या प्रमाणे आपल्या भूमिकेशी समरस होऊन जावे लागते, त्याप्रमाणे कथाकथकाला सुध्दा कथेशी समरस व्हावे लागते. कथा सांगताना निवेदक जर कथेशी समरस झाला नाही, तन्मय झाला नाही तर कथानिवेदनात उणेपणा राहील. कथा

रंगणार नाही, ती वरवरची होईल. ऐकणाऱ्याच्या हृदयाचा ठाव घेऊ शकणार नाही. कथानिवेदनातले मनोरंजनाचे उद्दिष्ट किंवा नीती संस्काराचे उद्दिष्ट असो ते साध्य होणार नाही. साध्य जर साधायचे असेल तर साधनाची एकरुपता आवश्यक ठरते.

कथानिवेदकाने आपल्या कथेशी आणि विद्यार्थी श्रोत्यांशी तन्मय झाले पाहिजे. कथेतील पात्रांशी तन्मय झाले पाहिजे. म्हणजेच जेव्हा निवेदक स्वतःच गोष्ट जगू लागतो तेंव्हाच गोष्ट जिवंत होते आणि त्या चैतन्यमयी वातावरणात श्रोतेही तन्मय होऊन जातात, भान हरपतात. ऐकणारा व कथा सांगणारा जेंव्हा एक होऊन जातो तेंव्हाच खऱ्या अर्थी कथा साकार होते.

कथा सांगतांना कथा सांगणारी व्यक्ती निवेदक म्हणून कथेत असावीच लागते ती बाजूला कथेबाहेर राहून चालत नाही. ती तशी बाहेर राहिल्याचे ऐकणाऱ्या बालकांनाही जाणवल्याशिवाय रहात नाही आणि मग श्रोतेही कथेपासून मनाने बाजूला जातात व अशा अवस्थेत कथा ही आनंददायक न रहाता रुक्ष, कंटाळवाणी होते. कथेचा आत्माच अशावेळी हरवलेला असतो आणि म्हणून त्यापासून कांहीच परिणाम साधला जात नाही. अशी कंटाळवाणी रसहीन कथा ऐकण्यात विद्यार्थ्यांना रस वाटत नाही. नावड उत्पन्न होते आणि मुलांची आनंदप्रवृत्ती कोमेजून जाते. अशा प्रकाराने केवळ मुलांनाच त्रास होतो असे नाही तर कथानिवेदकालाही दगदग झाल्याची जाणीव होते. यातूनच कथा सांगण्यातला जो आनंद तो मिळत नाही. म्हणून मुलांची मुळातच असलेली आनंदप्रवृत्ती कशी फुलेल, कशी बहरेल याचा विचार करुन कथा निवेदन झाले पाहिजे आणि असे कथा निवेदन करणे तन्मयतेशिवाय साधणार नाही. तनमनाने ध्यास घेतल्यावरच कलासाधना साधते. कथानिवेदक हा देखील एक कलावंतच असतो म्हणून कलासाधनेतील कलावंताची तन्मयता त्याला साधली पाहिजे आणि ती जेवढी साधेल तेवढी त्याची कथा रंगेल आणि तेवढा तो उत्कृष्ट कथानिवेदक होऊ शकेल.

3) **वक्तृत्व:**

कथा प्रभावी करण्यासाठी ज्या कांही गुणांची आवश्यकता असते त्यात वक्तृत्व हे जास्त महत्वाचे असते.

वक्ता आपले विचार, भावना, हेतू भाषेच्या द्वारा दुसऱ्याला पटवून देत असतो. भाषेच्या द्वारे आपले विचार पटवून देण्यासाठी त्याची भाषा तयार असावी लागते, भाषेवर त्याचे प्रभुत्व असावे लागते. तसेच श्रोत्यांनुरुप व आपल्या विषयानुरुप भाषा कशी वापरावी याचे ज्ञान त्याला असणे आवश्यक आहे. भाषेचे सामर्थ्य, मर्म, खाचाखोचा याची वक्त्याला चांगली माहिती हवी. तसेच त्याचे वक्तव्य आकर्षक, मोहक, चित्तवेधक असायला हवे. श्रोत्यांना कथा ही ऐकत राहावी असे वाटले पाहिजे. नाहीतर रटाळ, भरताड कथानिवेदनाने श्रोते कंटाळून जातील म्हणून वक्त्याची वाणी मधूर, ओघवती, निर्दोष असायला हवी. ज्या व्यक्तीला अशी वाणी निसर्गतःच लाभली तो भाग्यवान परंतु सर्वच व्यक्तींना ही अशी वाणी लाभतेच असे नाही. अशा व्यक्तींना अभ्यासाने सुध्दा अशी वाणी थोडी फार प्राप्त करुन घेता येते. याबाबतीत डेमॉस्थेनिसचे उदाहरण नेहमी देता येते. डेमॉस्थेनिस हा एक उत्कृष्ट वक्ता म्हणून ख्यातनाम झाला. त्याच्या प्रभावी वाणीवर हजारो श्रोते लुब्ध असत. पण हाच डेमॉस्थेनिस तोतरा होता आणि त्याला नीटपणे बोलताही येत नव्हते. परंतु तोतऱ्या डेमॉस्थेनिसने चिकाटीने, जिद्दीने प्रयत्न केले, परिश्रमपूर्वक अभ्यास केला आणि वाणीवर प्रभुत्व मिळविले.

वक्तृत्व करणाऱ्या वक्त्याला भाषा आणि वाणी यावर जसा ताबा मिळवावा लागतो तसाच त्याला सभाधीटपणाही साधावा लागतो. उत्तम वाणी व भाषा असलेला माणुस चारचौघात गप्पा मारतांना त्यांची मते जिंकून घेऊ शकतो. परंतु सभाधीटपणा नसेल तर समुदायाबरोबर उभे राहून बोलायचा प्रसंग आला तर तो भयभीत होतो. शब्दाशब्दाला अडखळणे होते, घशाला कोरड पडते. म्हणून सभाधीटपणाही कमवावा लागतो, अंगी बाणवावा लागतो. तो अभ्यासाने, सवयीने अंगी बाणवता येतो. तसेच जी कथा आपण सांगणार असतो त्या कथेची जास्तीत जास्त माहिती व ज्ञान कथानिवेदकाला माहित असणे आवश्यक असते, तयारी ही असावी लागते. असे ज्ञान, माहिती व तयारी असेल तरच त्याच्या प्रतिपादनात आत्मविश्वास जाणवतो.

त्याचप्रमाणे मुद्देसुदपणा हा तर वक्तृत्वाचा विशेष गुण आहे. आपले म्हणणे, आपला विषय दुसऱ्यांना पटवून देण्यासाठी जे वक्तव्य करावे लागते ते सुसंबध्द व मुद्देसुद असावे लागते.

वक्त्याचा संबंध दोन गोष्टींशी असतो. एक त्याचा विषय आणि दुसरा म्हणजे त्याचे श्रोते. यापैकी श्रोत्यांचा विचार करतांना वक्त्याने श्रोत्यांच्या भावना, मनोवृत्ती आणि आकलनक्षमता याहि बाबीचा विचार केला पाहिजे. श्रोत्यांचेहि एक मानसशास्त्र असते. त्याची वक्त्याला चांगली ओळख असायला हवी, ते मानसशास्त्र अवगत असायला हवे.

सभेत उभे राहून वक्त्याने बोलले तर असे बोलावे की ते ऐकतांना श्रोत्यांची अंतःकरणे प्रसन्न व्हावी, कान वाग्रसाने भरुन जावे आणि डोळे आश्चर्याने विकास पावावे तसेच भूक, निद्रा, श्रम, दुःख आणि कालगती याचे त्यास भान राहू नये इतर सर्व कार्याचे विस्मरण पडून भाषण ऐकण्याकडेच त्यास अत्यंत उत्कंठा वाटावी आणि ते संपले असता फार वाईट वाटावे.

उत्कृष्ट वक्तृत्वाचे हे लक्षण कथानिवेदकाने आत्मसात करायला हवे. वक्तव्य करणे आणि कथा निवेदन करणे यात भिन्नता असली तरी दोहोंचे वाहन भाषा, वाणी हेच आहे. म्हणूनच कथानिवेदकाने सुध्दा भाषाशुध्दता, अर्थसंगती, उच्च व सुंदर विचार ही साध्य केली पाहिजेत. उत्तम वक्तृत्वाची खुबी माहित असलेला कथानिवेदक उत्तम कथाकथन करण्यासाठी या कलेचा उपयोग करुन घेऊ शकेल. आपली कथा खुलवू शकेल.

4) शब्दसंपदा:

कथा निवेदनात भाषेचे महत्व अनन्यसाधारण आहे म्हणून कथेची भाषा कशी असावी याचा विचार कथानिवेदकाने करावयास पाहिजे. प्रथमतः असे लक्षात ठेवलेच पाहिजे की कथेची भाषा अमूक अशी, असे साचेबंदपणाने ठरविता येणार नाही. कारण प्रत्येक गोष्ट ज्याच्यासाठी अवतरते त्याच्यासाठी आपली भाषा घेऊन येत असते. परिकथेची भाषा ऐतिहासिक भाषेला चालत नाही. भाषा ही त्या त्या कथेचे वस्त्र असल्यासारखी असते. या वस्त्राचा ताणाबाणा शब्दांनी विणलेला असतो म्हणून ज्यापासून भाषेची वीण तयार होते त्या शब्दांविषयी

कथानिवेदकाने विचार करणे अगत्याचे आहे. मुलांच्या बाबतीत तर शब्दांचा विचार हा फारच महत्वाचा ठरतो. कारण मुले ही एक एक शब्द ऐकून, टिपून, स्मरणात साठवून, पुनरुच्चार करुन तो आत्मसात करीत असतात. सारांश कथानिवेदकाने वयोमानानुसार मुलांची शब्दसंपदा लक्षात घेऊन कथेची शब्दयोजना केली पाहिजे.

5) **अभिनय:**

कथा खुलवावी लागते, फुलवावी लागते. कथा रंगविण्यासाठी योग्य भाषेबरोबरच अभिनयाची मदत घ्यावी लागते. प्रत्येक व्यक्ती अभिनय करीत असतेच. प्रत्यक्ष रंगमंचावर नाही तरी व्यवहारात अनेक तऱ्हेचे मुखवटे चढवून माणसे वावरत असतात. या व्यतिरिक्त आपल्याला दुसऱ्याच्या नकला करण्याची मोठी खोड असते, हौस असते. लहान मुले देखील अशा नकला करुन दाखवित असतात. त्याचप्रमाणे जेव्हा ती वेगवेगळ्या प्रकारचे खेळ मांडतात, तेंव्हा तर ती मोठ्या व्यक्तीच्या नकला तन्मयतेने करीत असतात. ती बाबा होतात, आई होतात, शिक्षक होतात, बाई होतात, डॉक्टर होतात, शिपाई, डॉक्टर, घोडेस्वार, इंजिन ड्रायव्हर असे काय वाटेल ते ती होतात. त्यांच्या निरीक्षणात जे जे कांही असेल ते ते बनण्यात त्यांना आनंद वाटत असतो. या साऱ्यांच्या भूमिका ते वठवित असतात. याचाच अर्थ असा की बालपणापासूनच अभिनयाशी आपला संबंध आलेला असतो.

तसेच कथेत कांही पात्रे असतात. ती एकमेकांशी बोलत असतात. प्रत्येक व्यक्तीचा आवाज भिन्न असतो व बोलण्याची पध्दत वेगळी असते. म्हणूनच ते एकाच सुरावटीत ऐकायला मजा वाटत नाही. पण तेच जर दोन व्यक्तींचा भिन्न भिन्न आवाज कल्पून त्या त्या आवाजात बोलले तर रंगत वाढते. बोलता बोलता प्रसंगानुसार आवाजाचा चढ उतार केला तर संभाषणात आणखीनच रंगत वाढते ते निर्जिव न रहाता जिवंत होते.

कथेतल्या पात्रांचे कथेतील काम, त्यांचा दर्जा, त्यांची स्वभावरेखा कशी आहे हे सारे लक्षात घेऊनच त्यांचे बोलणे, वागणे ठरवावे लागते. समजा एखाद्या कथेतील कुत्रा हा फार चांगल्या स्वभावाचा, इमानदार, विश्वासू आणि अत्यंत परोपकारी सज्जन असा आहे तर त्या

कुत्र्याच्या तोंडची भाषासुध्दा हे स्वभाववैशिष्ट्य प्रकट करणारी शांत, सौम्य, संथ, हळुवार अशी हवी. एखाद्या साहसात उडी घेण्याची प्रतिज्ञा करणारा वीर राजपुत्र खड्या भाषेतच ती प्रतिज्ञा करेल. गुळमुळीत भाषेत तो बोलणार नाही. शोकविव्हल पात्रांचा आवाज तसाच आर्त करुण असेल आणि गमत्या पात्राचा खळाळता आल्हादकारक आवाज राहील.

6) **शारीरिक अभिनयः**

आवाजाच्या अभिनयाबरोबरच कथानिवेदकाने यथायोग्य अशा शारीरिक हालचालीही करणे आवश्यक असते. हातवारे, मुद्राभिनय यांचे फार मोठे सहाय्य कथेला होत असते. कथेतील धीर वीर राजपुत्र दुष्टांचा संहार करावयाची प्रतिज्ञा करतो तेंव्हा नुसतीच द्वेषपूर्ण वाणी उच्चारुन भागत नाही तर त्याच्या साऱ्या शरीरातून तो द्वेष प्रकट व्हावा लागतो. त्यावेळी त्याची छाती आत्मविश्वासाने फुगलेली असेल, मनगट कट्यार पेललेले असेल, पाय योग्य त्या पवित्र्यात असतील, मुद्रेवर आणि विशेषतः डोळ्यात ठिणगीची चमक तरळेल असा आभास निर्माण होणे आवश्यक आहे.

कथाकथन करतांना शरीराचा, हातवाऱ्यांचा प्रसंगानुरुप उपयोग करुन घेतलाच पाहिजे. ज्यावेळी कथानिवेदक कांही न हालचाल करता कथा सांगतो त्यावेळी सहाजिकच त्याचा परिणाम आवाजावरही होतो. हवा तितका आवाजातला चढउतार साधत नाही. त्यामुळे कथाकथन रंगत नाही.

कथानिवेदकाने आपली कथा प्रभावी होण्यासाठी शरीराच्या आणि ध्वनिच्या यथायोग्य अभिनयाची जोड कथेला दिली पाहिजे. मात्र अतिरिक्त अभिनय करुन गोष्टीचे नाटक होऊ देऊ नये. कथा ही कथाच राहिली पाहिजे. कथेतील अभिनय हा कथेच्या निवेदकाचाच राहिला पाहिजे. तो नाटकातील नटाच्या अभिनयाहून किंवा एकपात्री प्रयोगाच्या अभिनयाहून वेगळा आहे. तसेच कथेतील अभिनय हा श्रोत्यांनुसार थोडाफार बदलावा लागतो म्हणजेच तो सदासर्वदा मुक्त असावा लागतो.

तसेच आणखी एक महत्वाची गोष्ट अशी की कथानिवेदक हा कथा सांगणारा असतो.

अभिनयाच्या धुंदीत कथानिवेदकाने आपली ही भूमिका कधीही विसरता कामा नये. कथानिवेदक हा कथा सांगताना आवश्यक तेथे पात्रानुरुप अभिनय जरुर करेल परंतु त्याच्यातला कथानिवेदक हा सतत जागृत राहील. तो अधून मधून कथेत येत राहील व कथा पुढे नेण्यासाठी तोच नेतृत्व करेल. तो कथेचा तसाच श्रोत्यांचाही मार्गदर्शक, पालक, शिक्षक, वाटाड्या अशी महत्वपूर्ण कामे करीत राहील. कथेतील दुवे जुळविणे, नाती सांगणे, पार्श्वभूमी तयार करणे इ. कामे कथा सांगतासांगताच त्याला करावी लागतात. म्हणून घटकेत तो गोष्टीत असतो तर घटकेत गोष्टीच्या बाहेरही जाऊ शकतो. नाटक सिनेमातील नटाला ते स्वातंत्र्य नसते आणि अशी विविध अवधानेही सांभाळावी लागत नसतात.

कथा सांगतांना अतिरिक्त हावभाव, अंगविक्षेप किंवा अ... यक उठाठेव केल्याने कथा ऐकणाऱ्याचे मन भरकटते किंवा कथेमधून निघून तिसरीकडेच जाते.

थोडक्यात कथाकथनात अनुषंगाने आवश्यक त्या अभिनयात सहजता पाहिजे, जिव्हाळा पाहिजे तरच कथा परिणामकारक होते.

7) **आवाजाची तयारी:**

कथाकथनासाठी शारीरिक आणि ध्वनिच्या अभिनयाबरोबरच कथा निवेदनासाठी आवाज हेच वाहन असल्यामुळे आवाजाची काळजी, आवाजाची तयारी निवेदकाला करायला हवी. आपले निवेदन श्रोत्यांना स्पष्ट, स्वच्छ तर कळावेच परंतु ते प्रभावी, विविध रंगी आणि सुखावह व्हावे याची काळजी कथा निवेदकाने घेतली पाहिजे. यासाठी स्वतःच्या आवाजावर त्याने ताबा मिळविलेला असला पाहिजे.

आवाजातही निरनिराळे प्रकार असतात. एखादा आवाज मंद असतो, तर एखादा तीव्र असतो, एखादा उंच असतो तर एखादा नीच असतो, एखादा कर्कश्य असतो तर एखादा मंजुळ असतो. तसेच हसत बोलतांना, मोठ्याने बोलतांना, राग व्यक्त करतांना, सहानुभूतीने बोलतांनाचा आवाज वेगवेगळा असतो. त्याचप्रमाणे नाराजीत बोलतांना, आनंदात बोलतांना, चारचौघात बोलतांना आणि जास्त लोकांचेपुढे बोलतांनाचे आवाजात फरक असतो, अंतर असते.

म्हणून वेगवेगळ्या स्वरांची वैशिष्ट्ये कथानिवेदकाने जाणून घेतली पाहिजेत. स्वरांची जात कळली पाहिजे, स्वरांचा वजनदारपणा ( Vigorous Articulation ), विस्तार ( Range ), समग्र स्वरविस्तारातील समतोल ( Proper intensity balance over the range ) हे बारकावे कथानिवेदकाने आत्मसात केले पाहिजेत. कांही लोक कृत्रिम आवाजात बोलतात, भाषाही कृत्रिम वापरतात, उच्चारण्यात शब्दाशब्दावर भर टाकल्याने भाषा कृत्रिम होते. कथानिवेदकाने असले सदोष आणि कृत्रिम आवाज कटाक्षाने टाळले पाहिजेत आणि पात्रांचा स्वाभाविक आवाज मोकळेपणाने वापरला पाहिजे. निवेदनात आवाजातला कर्कश्यपणा (Harsh Voice) जसा टाळला पाहिजे तसाच आत्यंतिक संगीतमय आवाज (Musical Voice) सुध्दा टाळला पाहिजे. आपल्या स्वाभाविक स्वरांचा त्याने वापर केला पाहिजे आणि हे करीत असतांनाच भाषा, स्वर ऐकणाऱ्याला रुक्ष वाटणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे. कथानिवेदकाने आपल्या भावनेचा रंग आवाजावर चढवला म्हणजे भाषा श्रवणीय व सुंदर होते. स्वरयंत्राची नियंत्रणपूर्वक हालचाल करण्याचे कसब जर साधले तर आवाजावर विविध रंग छटा आणता येतात. अशा तऱ्हेचे नियंत्रण किंवा एकूण आवाज तयार करणे हे एक मोठे शास्त्रच आहे. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाने व अभ्यासाने हे अवगत करता येण्यासारखे आहे.

दीर्घश्वसन, प्राणायाम, पठण अशा तऱ्हेच्या व्यायामांनी आवाज कमावता येतो. दीर्घश्वसनाविषयी रुथ स्वायर ही लेखिका पतंजलीचा उल्लेख करुन लिहिते.

> Patanjali, one of the Hindu mystics, writes in his earliest of the 'Sutras' that spiritual force may be controlled by the breath, the in-drawing and out-drawing of it rightly. Every-one who has made the attempt to do this with patience has discovered it

to be true. There will assuredly come a quieting of apprehension, a sense of fresh inspiration and inner force.

The power to breath deeply, correctly, has a value beyond heatth and the furtherance of good voice. It can put down nervousness, and bring a quiet strength to the breather which makes for poise, for self control, for an easier approach to the ordeal of speaking in public. [10]

Voice culture म्हणजे स्वरसाधना किंवा आवाजाची तयारी हा एक तसा स्वतंत्र विषय आहे. नट, गायक, वक्ता या सर्वांप्रमाणेच कथानिवेदकानेही ह्या विषयाची ओळख करुन घेतली पाहिजे आणि आपल्या कथानिवेदनाला उपयुक्त असा त्यातील भाग आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**9) चित्रमयता:**

गोष्टीत जशी पात्रे असतात, ती बोलतात, चालतात तशीच गोष्टीला कांही काळवेळ असते, स्थलसुध्दा असते. गोष्टीची सुरुवात अशी होते. एक होतं गाव. मग गांव कसं आहे हे सांगणं आलच. हे सांगणं, वर्णन करणं म्हणजेच चित्रमयता. याने गोष्टीतील पार्श्वभूमी तयार होते. त्यामुळे गोष्टीला मांडणी किंवा कोंदणही मिळते. गावाप्रमाणेच जंगल, राजमहाल, किल्ला, उद्यान, सरोवर अशी कितीतरी स्थळे गोष्टीत असतात ती त्या त्या ठिकाणी शब्दानेच निवेदकाला साकार करावी लागतात. नाटकात वा चित्रपटात त्या त्या स्थळाचे नेपथ्य उभे करता येते. श्रवण कथेत निवेदकाजवळ फक्त शब्द असतात आणि या शब्दाच्या सहाय्याला असते त्याची वाणी आणि अभिनय.

कथेत जशी स्थळे असतात तसाच काळवेळही असतो. एखाद्या कथेत वेळ रात्रीची असेल तर निवेदकाला रात्र शब्दाने श्रोत्यांपुढे उभी करावी लागते. वेळ सकाळची असेल तर ती तशी वर्णनाने साकार करावी लागते. दुपारची वेळ असेल तर तशीच ती शब्दातून विद्यार्थ्यांसमोर शब्दाने उभी करावी लागते आणि हे चित्रण जेवढे चांगले जमेल तेवढे मुलांच्या कल्पकतेला (Imagination)पोषक ठरेल. मुलांची कल्पनाशक्ती, कल्पानासृष्टी समृध्द बनेल.

## 9) बहुश्रुतपणा:

कथा खुलविण्यासाठी, फुलविण्यासाठी कथानिवेदकाजवळ बहुश्रुतपणा असावा लागतो. कथा खुलविण्यासाठी, फुलविण्यासाठी ब-याचश्या उत्तमोत्तम गद्य उता-यांचे, म्हणी, वाक्प्रचार, चुटके इत्यादींचे पाठांतर हवे. समृध्द वाचन हवे. तीव्र स्मरणशक्तीही हवी. म्हणजेच कथा फुलविण्यासाठी, खुलविण्यासाठी त्यातील कांही गोष्टींचा कथानिवेदकाला सहज उपयोग करुन घेता येईल. गोष्टीत कांही जागा असतात त्या कथानिवेदकाने हेरावयाच्या असतात आणि आपल्या बहुश्रुततेने त्या भरावयाच्या असतात तरच गोष्ट चहुअंगाने भरते. फुलांच्या गुच्छासारखी भरदार होते, डौलदार बनते, चवदार लागते.

बहुश्रुतपणासाठी पुष्कळ वाचन, पुष्कळ श्रवण, पुष्कळ निरीक्षण हा मंत्र कथानिवेदकाने लक्षात ठेवला पाहिजे.

## 10) श्रोत्यांचा सहभाग:

आणखी एक महत्वाची बाब म्हणजे कथानिवेदकाने कथानिवेदकाचे वेळी वक्त्यासारखे केवळ एकतर्फी बोलून चालत नाही तर आपल्याबरोबर आपल्या श्रोत्यांनाही बोलते करावे लागते. त्यांच्याकडून कांही वदवावे लागते. गोष्टीत त्याशिवाय रंग भरत नाही आणि श्रोतेही लहान असल्यामुळे एके ठिकाणी स्वस्थ बसत नाहीत. मोठी माणसे ही व्याख्यान आवडले नाही तर किंवा कळले नाही तर ते सहन करुन घेतील. उठून न जाण्याची, गडबड गोंधळ न करण्याची सभेची सभ्यता पाळतील. परंतु मुलांजवळ असला औपचारिकपणा अपेक्षित नसतो. गोष्ट आवडली तर मनापासून ऐकतील, नाही आवडली तर नापसंतीची

पावतीही तिथेच देतील. चुळबुळ करतील, गडबड करायला लागतील, खिडकीतून बाहेर डोकावतील एवढेच नाही तर उठूनही जातील यासाठी या श्रोत्यांना केवळ श्रवणाचेच काम देऊन भागत नाही तर निवेदकाने त्याला आपल्या गोष्टीत सहभागी करुन घ्यावे लागते. गोष्टीसाठी श्रोत्यांचा सहभाग आवश्यक असतो. हा सहभाग मिळविण्यासाठी कथा सांगता सांगताच तिच्यातला कांही भाग निवेदकाने मोठ्या खुबीने, सूचकतेने श्रोत्यांकडून वदवून घेतला पाहिजे. अशा रितीने निवेदकाने श्रोत्यांना आपल्या कथेत खुबीने सतत गुंतवून ठेवले पाहिजे. कथेची रंगत वाढविली पाहिजे.

**11) वेळेचे भान:**

इतर बाबीप्रमाणे कथाकथन करतांना एका महत्वाच्या गोष्टीकडे लक्ष ठेवले पाहिजे ते म्हणजे वेळेचे भान.

आत्मविश्वासाने कथा सांगायला सिध्द झालेल्या निवेदकाने कथेची निवड केल्यानंतर तो तन्मय झाला, वक्तृत्व, शब्दसंपदा यथायोग्य वापरली, अभिनयाची जोड दिली, चित्रमयतेने कथेला कोंदण दिले, बहुश्रुतपणाने ती बहुरंगी, उत्कृष्टरित्या फुलविली आणि विद्यार्थी श्रोत्यांचा सहभाग घेऊन ती रंगविली तरी शेवटी या महत्वाच्या मुद्याकडे लक्ष दिले पाहिजे.

प्रत्यक्ष दिसायला हा मुद्दा क्षुल्लक वाटतो परंतु तो फारच महत्वाचा आहे. वरील विविध गोष्टींचे सहाय्य घेऊन रंगविलेल्या गोष्टीवर वेळेचे अवधान बाळगले नाही तर कथाकथनाचा परिणाम क्षीण होतो. उद्दिष्ट लांब जाते म्हणून कथाकथनात रंगून गेलेल्या कथानिवेदकाने वेळेचे भान ठेवले पाहिजे. महत्प्रयासाने रंगविलेली कथा आणि रंगात आलेले श्रोते विद्यार्थी हातचे लवकर सोडू नयेत असा मोह होण्याचा संभव असतो. आणखी बोलावे, आणखी सांगावे असे वाटते पण हा मोह कटाक्षाने आवरला पाहिजे. कथा चढत चढत अत्युच्च बिंदुला पोहोचल्यावर मोठ्या चातुर्याने कथानिवेदकाने ती संपविली पाहिजे. तरच ती श्रोत्यांच्या मनात रेंगाळत राहते. अपेक्षित परिणाम व संस्कार घडवून आणू शकते. उत्तम गोष्ट उत्तम रितीने सांगितली असता ती गोष्टच हे काम करायला समर्थ असते.

आपण ती फक्त उत्कृष्ट रितीने सांगायची असते.

कथा किती वेळ सांगितली यापेक्षा कथा कशी सांगितली याला फार महत्व आहे. म्हणून चांगली गोष्ट लवकर संपली तरी बिघडत नाही. कथेला वेळीच संपू द्यावे. उगाच पाल्हाळ लावून वेळ भरण्यासाठी तिला लांबवू नये. कोणती गोष्ट किती वेळ चालेल हे सामान्यपणे जाणून गोष्टीची निवड आधीच तशी करावी पण वेळ भरण्यासाठी गोष्टीला राबवू नये. अशी राबवलेली गोष्ट प्रभावी ठरत नाही. साधारणपणे 35 ते 45 मिनिटे एवढा कालावधी पुरेसा आहे. या वेळेपेक्षा अधिक काळ दिल्यास मुले चुळबुळ करु लागतात. हालचाल करु लागतात. यासाठी कथानिवेदकाने वेळेचे भान ठेवले पाहिजे.

कथानिवेदकाने वरील अकरा गोष्टीकडे लक्ष पुरवून निवेदनात याचा वापर केला तर त्याची कथा पुष्कळशी श्रवणरम्य व प्रभावी होईल. निवेदकाला आपल्या अनुभवातून यात आणखी भरही घालता येईल आणि हा महत्वाचा विषय समृध्द करता येईल.

उत्तम कथानिवेदन कसे असते हे पटविण्यासाठी मेरी शेडलॉक नावाच्या एका कथानिवेदिकेबद्दल रुथ स्वायर या लेखिकेने आपले मत प्रकट केले आहे. तिला शेडलॉकबद्दल जी गुणवैशिष्ट्ये आढळली ती अशी

> Directness, Simplicity, Elusiveness, Dramatic Interpretation, Intonation, Enunciation, charm, Her Voice, Sense of Humour, Strong compelling sympathy between herself and Her listeners, Her own enjoyment, Her Vitality, Her Spontaneity, She was a born ar-tist. She was a Painstaking ar-tist. She gave the impression of creating what she told. She

> created atmosphere before she spoke. Everyone was aware of her; She had imagination. She had a sense of Poetry. She shunned the mediocre and the artificial. She had integrity. [11]

एकंदरीत सरळ, सोपे, आभासयुक्त, नाट्यमय, स्वरवैचित्र्यपूर्ण, स्पष्ट प्रतिपादित, मोहक, विनोदगर्भित, श्रोत्यांविषयी उदंड सहानुभूती, स्वानंद, जिद्द, उत्स्फूर्तता, परिश्रम, वातावरण निर्मिती, कल्पकता, काव्यात्मता, विलक्षण आस्था इत्यादी गुणवैशिष्ट्ये शेडलॉकच्या कथानिवेदनात आढळतात.

तसेच आदीपुराणातही कथाकथकाचे अंगी कोणकोणते गुण आवश्यक आहेत त्याची लांबलचक यादी दिलेली आहे.

"कथाकथक सदाचारी, स्थिरबुध्दी, संयमी, प्रियदर्शन, प्रियभाषी, सुसंस्कृत वाणीचा, प्रतिभाशाली, सहिष्णू व उदार स्वभावाचा असावा. त्याला अनेक विद्या, कला अवगत असाव्यात. आपली विधाने दृष्टान्तांनी दृढ करण्याचे वाक्चातुर्य त्याच्या ठिकाणी असावे. कथाकथन करतांना त्याने भूवया चढवू नयेत, आक्रोश करुन बोलू नये. विशेष म्हणजे श्रोत्यांची पात्रता आणि ग्रहणक्षमता लक्षात घेऊन त्या अनुरोधाने आपल्या कथेचा प्रपंच करावा."

या गुणांनी युक्त असल्यास कथाकथन उत्तमप्रकारे होऊ शकते मग ते कोणत्याही प्रकारचे कथाकथन असो.

कथाकथनाच्या आवश्यक तंत्राचा व आवश्यक बाबींप्रमाणे कथाकथनाची सुरुवात व शेवट कसा करावा हे पहाणे आवश्यक आहे.

### 3.6 कथाकथनाचा प्रारंभः

ऐतिहासिक कथा आल्हादकारी, मनोरंजनात्मक असतेच. तशीच ती प्रेरणादायी व स्फूर्तिदायीही ठरु शकते. याचे मराठ्यांच्या इतिहासातील मोठे उदाहरण म्हणजे छत्रपती

शिवाजी महाराज. स्वातंत्र्याची आकांक्षा त्या कोवळ्या मनात उत्पन्न केली, रुजवली, फुलवली ती जिजाबाईंनी आणि तीही कथा सांगून सांगून. म्हणजेच कथा ही सर्व कांही करु शकते.

अशा या कथाकथनाचा प्रारंभ आकर्षक पध्दतीने कसा करता येईल याचा विचार केला पाहिजे कारण कथाकथनाच्या प्रारंभावरच कथेची पुढची यशस्विता बरीच अवलंबून असते. म्हणून कथेची सुरुवातच चित्तवेधक झाली पाहिजे. आपल्या पारंपारिक कथानिवेदकांनीसुध्दा याचा चांगला विचार केलेला दिसतो. त्यांनी कथाकथनाचे सुरुवातीचे कांही मायनेच कथा सांगून सांगून तयार केलेले दिसतात. या मायन्यांशी नंतर ते वरचेवर ऐकून ऐकणाऱ्यांच्या मनात एक साहचर्य निर्माण झाले आहे. त्यामुळे नुसते 'एकदा काय झाले' असे म्हणायचा अवकाश की मुले कान टवकारुन, एकाग्र होऊन, गोंगाट बंद करुन, बैठक नीट घालून चटकन ताठ बसतात आणि हुंकार टाकून कथा ऐकायला तयार होतात. त्यांचा कंटाळा दूर कुठेतरी निघून जातो. चेहऱ्यावर प्रसन्नता खुलते व विद्यार्थ्यांच्या मनाचे दरवाजे पटापट उघडले जाऊन कथानिवेदकाला तेथे प्रवेश मिळतो.

अनेक वेगवेगळ्या प्रकारे कथाकथनाचा प्रारंभ करता येतो. उदा.

'एकदा काय झालं'

'म्हणे एका गावात'

'आटपाट नगर होतं'

'कोणे एके काळी'

'एक होत गाव'

'एकदा एका गावात'

'अशीच एक गोष्ट आहे'

'शंभर वर्षापूर्वीची गोष्ट आहे'

अशा वेगवेगळ्या रीतीने कथेची सुरुवात होते. यासाठी वेगळ्या प्रस्तावनेची गरज नसते. मात्र अशाप्रकारे कथेची सुरुवात कशीही असो ती लक्षवेधक आकर्षक असावी याकडे

कथानिवेदकाने लक्ष पुरविले पाहिजे.

**3.7 कथाकथनाचा शेवट:**

जी खबरदारी कथाकथनाच्या प्रारंभाविषयी घेतली पाहिजे तीच कथेच्या शेवटाबददलही घेतली पाहिजे. सुरुवातीप्रमाणेच कथेचा शेवटही आकर्षक, नाट्यपूर्ण, ऐकणाऱ्याच्या मनात बराच काळ गोष्ट रेंगाळत राहील असा करावयास पाहिजे.

**3.8 समारोप:**

या प्रकरणात प्रत्यक्ष प्रायोगिक कार्य सुरु करण्यापूर्वी आवश्यक असणाऱ्या तात्विक पार्श्वभूमीचे वर्णन केलेले आहे. यामध्ये विविध विषय अध्यापन पध्दतींची उपयुक्तता स्पष्ट केली आहे. त्याचप्रमाणे इतिहास विषयाच्या विविध अध्यापन पध्दतींचा आढावा घेऊन त्यातील कथाकथन पध्दतीची उपयुक्तता कोणती हे स्पष्ट केले आहे. कथाकथन पध्दतीचा जाणीवपूर्वक योग्य प्रकारे वापर होण्यासाठी आत्मविश्वास, तन्मयता, मुद्राभिनय, शारीरिक अभिनय, आवाजातील चढउतार, बहुश्रुतपणा, चित्रमयता, वि... गृहभाग इत्यादी आवश्यक तंत्रांचा वापर कसा करावा आणि कथाकथनाचा प्रारंभ व शेवट योग्य प्रकारे कसा साधून पध्दती अधिक परिणामकारक कशी होईल इत्यादी बाबींचा उहापोह केलेला आहे.

# संदर्भ सूची


1) Aggarwal J.c.: Teaching of History ( Vikas house, 20/4 Industrial Area sahibabad 201 010 ) P.66. (1984)

2) The Encyclopaedia and dictionary of Education Volome IV.

Edited by Professor Foster Watson. Printed by Sin Isaac Pitman and Sons Ltd. England (1922) P. 1598.

3) ठिगळे, श्री.मा.: इतिहास कसा शिकावा व शिकवावा.
(सुहास प्रकाशन. साई कृपा 1205/5 आपटे रोड पुणे 4 ) पृ.61. (1965)

4)व

5)गोडबोले अनिल : शिक्षण आणि समाज, एप्रिल — जून 1989 ( संपादिका चित्रा नाईक, सामाजिक विकासातून शिक्षण आणि शिक्षणाद्वारा सामाजिक विकास कथाकथन आणि संस्कार ) पृ.24.

6) घाटे, वि.द. : इतिहास, शास्त्र आणि कला (देशमुख प्रकाशन.22 कसबा पुणे 2 ) (1958) पृ.73.

7) आमटे बाबा : कथा आणि कथाकथन ( मंगळवेढेकर राजा, अनिरुध्द साहित्य प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे 411 030 ) पृ.14 (1982)

8) स्वायर रुथ : कथा आणि कथाकथन (मंगळवेढेकर राजा, अनिरुध्द साहित्य प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे 411 030 ) पृ.130 (1982)

9) स्वायर रुथ : कथा आणि कथाकथन ( मंगळवेढेकर राजा, अनिरुध्द साहित्य प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे 411 030 ) पृ. 135. (1982)

10) स्वायर रुथ : कथा आणि कथाकथन ( मंगळवेढेकर राजा, अनिरुध्द साहित्य प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे 411 030 ) पृ. 146. (1982)

11) स्वायर रुथ : कथा आणि कथाकथन ( मंगळवेढेकर राजा, अनिरुध्द साहित्य प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे 411 030 ) पृ.152. (1982)

12) जोशी महादेवशास्त्री : भारतीय संस्कृती कोश खंड 2 ( भारतीय संस्कृती कोश मंडळ ) (1964) पृ.46.

------